अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com ▪ बुधवार, दि.१४ फेब्रुवारी २०२४ ▪ ▸ वर्ष : २२ वे ▸ अंक : १३६ वा ▸ किंमत : ५ रुपये ▸ पाने ८

## भारताचे माजी कर्णधार दत्ताजीराव गायकवाड यांचे निधन

**सोलापूर** : भारताचे माजी कर्णधार दत्ताजीराव गायकवाड यांचं बडोद्यामध्ये निधन झालं. वयाच्या ९५ व्या वर्षी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. भारताचा माजी खेळाडू इरफान पठाण यानं ट्वीट करत याबाबतची माहिती दिली.

दत्ताजीराव गायकवाड यांनी १९५२ मध्ये इंग्लंड दौऱ्यात कसोटीमध्ये पदार्पण केले होते. दत्ताजीराव गायकवाड यांनी मुंबई विद्यापीठ आणि बडोद्यात महाराजा सयाजी विद्यापीठाकडून क्रिकेट करिअरला सुरुवात



केली होती. दत्ताजीराव गायकवाड यांनी भारतासाठी ११ कसोटी सामने खेळले आहेत, त्यामध्ये त्यांनी १८.४२ च्या सरासरीने ३५० धावा केल्या. १९५२ मध्ये लॉर्ड्सवर इंग्लंडविरोधात त्यांनी कसोटीमध्ये पदार्पण केले होते. १९५९ मध्ये इंग्लंड दौऱ्यात त्यांनी भारतीय संघाची धुरा पाहिली होती. त्यांच्या नेतृत्वात भारतीय संघाला ५-० ने पराभवाचा सामना करावा लागला होता. दत्ताजी कायकवाड यांनी १९४७ ते १९६१ यादरम्यान क्रिकेटमध्ये नशीब अजमावले. देशांतर्गत क्रिकेटमध्ये त्यांच्या नावावर १४ शतकांची नोंद आहे. महाराष्ट्राविरोधात २४९ धावांची खेळी केली होती. २०१६ मध्ये दत्ताजीराव गायकवाड भारताचे वयस्कर कसोटी क्रिकेटर झाले होते.

# खिळखिळत्या चाकोते गटाला भाजपकडून राजकीय सुरुंग

- नावलौकीक घराण्याच्या पारंपरिकतेला छेद
- बंद दाराआडची रणरागिणी भविष्यात महाराष्ट्राच्या राजकारणात
- चाकोते गटाची ताकद भाजपच्या पाठिशी

## दमदार नेतृत्वाची झेप घेण्यासाठी रंजिता चाकोतेंच्या पंखांना भाजपची ऊर्जा

**सुराज्य/शिवाजी भोसले**

**फोडाफोडीच्या राजकारणाची भाजपची एक्स्प्रेस सुसाट धावत आहे. शिवसेना, राष्ट्रवादी आणि काँग्रेस यांची साम्राज्ये खालसा करून त्यांना नेस्तनाबूत करत सर्वत्र 'कमळ'फुलिवण्याचा चंग बांधलेल्या भाजपने राज्याच्या राजकारणातील काही मातब्बर आणि प्रस्थापित घराण्यांना सुरुंग लावण्याचा अजेंडा राबविला आहे. तद्वतच अंतर्गत कलह,वाद, मतभेद पर्यायाने परकीयांपेक्षा स्व:कीयामुळेच खिळखिळत्या झालेल्या सोलापुरातील चाकोते गटाला भाजपने राजकीय सुरुंग लावला आहे. काँग्रेसची मोठी परंपरा असलेले हे घराणे या पक्षाने फोडले आहे.**

दरम्यान, चाकोते परिवारातील मदन चाकोते यांच्या सुनबाई रंजिता चाकोते या उच्चविद्याभूषित, आक्रमक, संघटनशील, धाडसी, माहेर तसेच सासर या दोन्हींकडे मोठा राजकीय वारसा असलेल्या चेहऱ्याला भाजपने आपल्या पक्षात प्रवेश दिला आहे. महाराष्ट्राच्या राजकीय पटलावर महिलांचे खमकेपणाने नेतृत्व करण्याची झेप घेण्यासाठी प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्यासह प्रदेश भाजपच्या टीमने रंजिता चाकोते यांच्या पंखात ऊर्जा भरली आहे.

विशेषत्वे, चाकोते परिवाराची चौथी पिढी आता राजकारणात आहे. पुरुषप्रधान संस्कृतीची पूजा बांधणाऱ्या या परिवाराने आपल्या परिवारातील महिलेचा चेहरा यापूर्वी कधीही राजकारणात आणला नाही. महिला आरक्षणाचा लाभ उठवून महिलेच्या आडून सत्तेचे पद घरात घेण्यासाठी या परिवाराने कधीच तडजोड केली नाही.

तथापि, रंजिता सकलेश चाकोते यांच्या भाजप प्रवेशाने नावलौकिक चाकोते घराण्याच्या पारंपारिकतेला छेद मिळाला. उल्लेखनीय बाब म्हणजे रंजिता चाकोते यांचे मोठे दीर सुदीप चाकोते हे काँग्रेस सेवा दलाचे युवा प्रदेशाध्यक्ष आहेत. त्यांचे दीर सुदीप चाकोते आणि रंजिता चाकोते यांचे एकत्रित कुटुंब आहे. ते एकाच घरात राहतात. रंजिता चाकोते यांच्या भाजप प्रवेशाने एकाच घरात भाजप आणि काँग्रेस असा संघर्ष पाहायला मिळू शकतो. चाकोते परिवाराच्या राजकारणात प्राबल्य नाही. सुदीप यांनी परिवाराचे राजकारणातील वजन कायम राखण्याचा प्रयत्न केला आहे.

### जिथं स्वागतासाठी रांगोळ्याच्या पायाघड्या तिथंच निषेधासाठी शाब्दिक तोफगोळ्यांची होती तयारी !

भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे हे सोलापुरातील जोडबसवण्णा चौक परिसरातील सकलेश आणि रंजिता चाकोते यांच्या निवासस्थानी चहा-पाण्यासाठी येणार होते. त्यांच्या स्वागताची तयारीदेखील सकलेश आणि रंजिता चाकोते यांनी केली होती. आकर्षक रांगोळ्यासह फुलांच्या पायघड्या तयार ठेवण्यात आल्या होत्या. तथापि, श्री. बावनकुळे यांना निवासस्थानी चहा-पाण्याला घेण्याला परिवारातील सुदीप चाकोते यांनी तीव्र विरोध केला. बावनकुळे यांचा ताफा निवासस्थानी आल्यास तीव्र निषेध करु असा दम सुदीप चाकोते यांनी भरल्याने समयसुचकता ओळखून दस्तुरखुद्द मदन चाकोते यांच्यासह सकलेश चाकोते यांनी बालाजी सरोवरमध्ये जाऊन श्री. बावनकुळे यांची भेट घेऊन 'आम्ही भाजपमध्ये प्रवेश करणारच आहोत, फक्त आज आमच्या निवासस्थानात चहा-पाणी करण्याला अडचण आहे' असे सांगितले. त्यावर बावनकुळे यांचा जोडबसवण्णा चौकात निघालेला जथा बालाजी सरोवरातच थांबला.



### ताई आप आगे बडो; पुरी भाजप आपके है साथ!

**रंजिता चाकोते यांना चंद्रशेखर बावकुळेंनी केले अश्वस्त; प्रदेशाध्यक्ष म्हणाले; ताई, भविष्यात तुम्हाला देऊ मोठी जबाबदारी!**

**मुंबई** : पूर्वजांपासून परिवारात असलेली काँग्रेसची विचारधारा धुडकावून देत चाकोते परिवारातील रंजिता सकलेश चाकोते यांचा आज मंगळवारी (ता.१३) मुंबईत मोठ्या थाटात भाजप प्रवेश झाला. प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी भगवे उपरणे देऊन रंजिता चाकोते यांना भाजपमध्ये प्रवेश दिला.

यावेळी प्रदेशाध्यक्ष बावनकुळे यांनी सौ. चाकोते यांना अश्वस्त करत पक्षाच्या माध्यमातून काम करण्याची मोठी ऊर्जा दिली. ताई, मोठ्या सन्मानाने आपला भाजपमध्ये आम्ही प्रवेश करून घेतला आहे. खूप चांगले काम करा. माझ्यासह भाजपची सगळी टीम तुमच्यासोबत आहे. तुमचे उच्च शिक्षण, सासर आणि माहेर या दोन्हींकडील राजकीय वारसा, महिलांमधील संघटन कौशल्य, खूप काही वेगळे करण्याची धडपड, सोलापूरच्या विकासाची आस, महिला सक्षमीकरण या सगळ्या पार्श्वभूमीवर, भविष्यात आम्ही तुमच्यावर मोठी जबाबदारी टाकत आहोत, असे वक्तव्य श्री. बावनकुळे यांनी करून सौ. चाकोते यांना अश्वस्त करीत भाजपची ऊर्जा त्यांच्या पाठीशी लावली.

यावेळी रंजिता चाकोते यांचे पती सकलेश चाकोते, सोलापूर शहर भाजपचे अध्यक्ष नरेंद्र काळे, वर्षा विभूते, सुरेखा भावी, विद्या जोडभावी, निर्मला कणगी, प्रा.नारायण बनसोडे, अशोक बावी, मल्लिनाथ जोडभावी आदी उपस्थित होते.

सोलापूरच्या चाकोते घराण्याला काँग्रेससोबतच्या राजकारणाची मोठी परंपरा आहे. या घराण्याचे पूर्वज स्वातंत्र्यपूर्व काळापासून काँग्रेसच्या समवेत आहेत. चाकोते परिवाराच्या चौथ्या पिढीपर्यंत काँग्रेसची विचारधारा सोबत आहे. या परिवाराच्या नसानसात काँग्रेस भिनलेली आहे. आमच्या परिवारातील जे कोणी भाजपसोबत गेले, त्यांचा आमचा राजकारणाशी संबंध नाही. भाजपसोबत गेलेले काँग्रेसचे कार्यकर्ते नव्हते.

**- विश्वनाथ चाकोते, माजी आमदार सोलापूर**



चाकोते परिवार हा पूर्वजांपासून गांधी घराण्यासोबत एकनिष्ठ आहे. चाकोते परिवाराची ओळखच मुळी एकनिष्ठ अशी आहे. काँग्रेससोबत आम्ही एकनिष्ठ असल्याने भाजपमध्ये प्रवेश करण्याला विरोध दर्शवला. त्याचा सूड उगविण्याचा प्रकार म्हणून आमच्या परिवारालाच सुरंग लावण्याचे पाप भाजपने केले आहे. भाजपकडून आमचे घर फोडण्याचे पाप केले जात आहे. भाजपचा हा कुटील डाव आहे.


**- सुदीप चाकोते, प्रदेशाध्यक्ष, काँग्रेस सेवादल**

पत्नी रंजिता या एमसीए आहेत. त्यांना 'आयएएस' होऊन समाजाची सेवा करायची होती. मात्र, विवाह आणि त्यानंतरच्या जबाबदाऱ्या यामुळे ते शक्य झाले नाही. मागील १७ वर्षापासून त्या सामाजिक काम करीत आहेत. महिला सक्षमीकरणासाठी झटत आहेत. त्यांच्यावर प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाचा प्रभाव आहे. महिलांच्या सक्षमीकरणासाठी त्याचबरोबर सोलापूरसाठी खूप काही प्रभावी करण्यासाठी त्यांची धडपड आहे. भाजपकडे काहीही न मागता त्यांनी प्रवेश केला आहे. भाजप प्रवेश करण्याला आमच्या परिवारातून विरोध आहे. भाजप प्रवेशाने संघर्ष वाढू शकतो. पण खूप काही चांगले होणार असल्याने संघर्षाची आम्हाला तमा बाळगण्याचे कारण नाही. तशी मानसिकता आम्ही केली आहे.

**- सकलेश चाकोते, सोलापूर**

**एकाच घरात काँग्रेस अन् भाजपचा कलगीतुरा; राजकारणातील प्रतिष्ठित परिवारात फोडाफोडी, काँग्रेस सेवा दलाचे प्रदेशाध्यक्ष सुदीप चाकोते यांच्या भावजयीच्या गळ्यात भगवे उपरणे**

### काँग्रेसी परिवाराचा विरोध झुगारुन भाजपमध्ये प्रवेश करणाऱ्या नेमक्या कोण आहेत रंजिता चाकोते?



- रंजिता चाकोते या मदन चाकोते यांच्या सूनबाई आहेत
- सकलेश चाकोते यांच्या त्या सौभाग्यवती आहेत
- प्रदेश काँग्रेस सेवादलाचे युवक अध्यक्ष सुदीप चाकोते यांच्या त्या थोरल्या भावजयी आहेत
- कऱ्हाड हे त्यांचे माहेर असून गवळी सावकार हे त्यांच्या माहेरचे प्रतिष्ठीत घराणे आहे
- अरविंद गवळी सावकार यांच्या त्या कन्या आहेत.
- एमसीए ही इंजिनिअरिंगची त्यांची पदवी घेतलेली आहे
- गेल्या १७ वर्षांपासून त्या अक्कनबळग महिला मंडळाच्या माध्यमातून त्या काम करीत आहेत
- उत्कृष्ट संवाद कौशल्य, सभाधीटपणा, आक्रमक बाणा आणि उत्तम संघटनकौशल्य त्यांच्याकडे आहे.
- आजोबांचा थेट यशवंतराव चव्हाण यांच्या राजकारणाला हातभार
- यशवंतराव चव्हाणांपासून गवळी सावकार परिवाराला राजकारणाचा परिस्पर्श
- रंजिता यांच्या आजोबांपासून वडील, चुलते, भाऊ सगळेच राजकारणात

### भाजप प्रवेशाचे रंजिता चाकोते यांनी काय सांगितले कारण?

- आतापर्यंत कोणती पार्टी ज्वाईन केली नव्हती
- मंडळाचे काम करताना मर्यादा येत होत्या, जागेचे काम होत नव्हते
- सगळ्या महिलांचा आग्रह होता सोलापूरच्या विकासासाठी आपणास चांगला प्लॅटफार्म हवा
- चांगली कामे करण्याच्या उद्देशाने पक्ष प्रवेशाचा विचार आला
- प्रामाणिकपणा, एकनिष्ठपणाने काम करण्यासाठी भाजप पक्ष निवड
- मोदींच्या १० वर्षातील कामाने प्रभावित होऊन प्रवेशाचा निर्णय
- बानकुळे आणि फडणवीस यांचे संघटनात्मक नेतृत्व प्रभावित करणारे
- सोलापुरातील विकास कामांची वाढणार गती
- भाजप प्रवेशामुळे घरात संघर्ष होणार नाही
- दीर सुदीप चाकोते हे त्यांचे काम करतील
- आम्ही भाजपचे काम करुन ध्येय साधण्याचा प्रयत्न करु
- आप्पांचा अशीर्वाद आहेत, सासरे, सासू या सगळ्यांचा मी चांगले काम करेन यावर विश्वास आहे.
- दीर सुदीप आणि आम्ही समजदार आहोत, पक्षावरुन कलह नाहीत
- आम्ही चर्चा करुन निर्णय घेतला आहे
- चांगल्या ध्येयाने मी पाऊल टाकले आहे, त्याचे चांगले परिणाम भविष्यात दिसतील

**चाकोते दाम्पत्य म्हणाले..काहीच अटी शर्थी न घालता प्रवेश**

भाजप प्रवेशाबद्दल विचारले ते म्हणाले, कसल्याच अटी किंवा शर्थी घालून आम्ही प्रवेश केलेला नाही. आम्हाला फक्त चांगले काम करायचे आहे. सोलापुरचा विकास आणि महिला सक्षमीकरण हाच आमचा अजेंडा आहे.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



तिसरी खुर्ची पण मागवा!

कल्याण
126-97-124

मुंबई
890-77-133

# शिवजयंती उत्सव नियमाचे पालन करीत आनंदाने साजरी करा

- सोलापुरात गुंडागर्दी आणि हुल्लडबाजीला थारा नाहीच
- पोलिस आयुक्त एम राजकुमार यांनी थेटच सांगितले व्हिजन

**सोलापूर** : शहरात साजरा होणारा शिवजयंती उत्सव नियमाचे पालन करीत आनंदाने साजरा करावा. उत्सव काळात गुंडागर्दी व हुल्लडबाजी खपवून घेतली जाणार नाही असा सज्जड दम पोलिस आयुक्त एम राजकुमार यांनी दिला आहे.

छत्रपती शिवाजी महाराज यांचा जयंती उत्सव साजरा करण्यासाठी शहरात ठिकठिकाणी मोठी तयारी सुरु आहे. येत्या १५ फेब्रुवारी ते १९ फेब्रुवारी दरम्यान शिवजयंती उत्सव साजरा होणार आहे.यानिमित्ताने पोलिस आयुक्तालयात शांतता कामिटी सदस्य आणि शिवजयंती जन्मोत्सव मंडळांचे पदाधिकारी यांच्या आयोजित बैठकीत पोलिस आयुक्त एम राजकुमार बोलत होते. पुढे बोलताना राजकुमार म्हणाले हा उत्सव सुरळीत पार पडावा यासाठी पोलीस प्रशासनाने योग्य ती खबरदारी घ्यायचे ठरवले आहे. शिवजयंती उत्सव साजरा करताना कायदा सुव्यवस्था राखत साजरा करावा, तसेच सामाजिक व प्रबोधनात्मक देखावे व्याख्यान, सांस्कृतिक कार्यक्रम घेत छत्रपती शिवाजी महाराजांचे चरित्र तरुण पिढीपर्यंत पोहचवण्याचा प्रयत्न करावा, सामाजिक दृष्टीकोनातून काम करावे अशा सूचना आयुक्तांनी केल्या. यंदा पारंपरिक वाद्याचा वापर करणाऱ्या व डॉल्बीमुक्त मिरवणूक काढणाऱ्या मंडळांचा सन्मान देखील करण्यात येईल.उत्सवाप्रसंगी पारंपरिक वाद्यांचा वापर करावा, शासनाच्या आदेशाप्रमाणे डिजेला कुठल्याही प्रकारची परवानगी नसणार आहे. तरीही पोलिसांनी ठरवून दिलेल्या २ बेस २ टॉप असे स्पीकर वापरावे. या बैठकीला अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, प्रादेशिक परिवहन अधिकारी अर्चना गायकवाड, पोलिस उपायुक्त परिमंडळ विजय कबाडे, पोलिस उपायुक्त अजित बोऱ्हाडे, पोलिस उपायुक्त दीपाली काळे, सहायक पोलिस आयुक्त, महावितरणाचे सहा.अभियंता आशिष मेहता यांच्यासह शांतता कमिटी सदस्य तसेच मंडळाचे पदाधिकारी उपस्थित होते.



### पोलिस आयुक्तांचे आवाहन

- शहरात फ्लेक्स लावणाऱ्या तरुणांना फ्लेक्स लावण्यासाठी येणाऱ्या खर्चाची माहिती विचारणार
- सोलापूर शहर गुंडागर्दीच्या हातात देऊ नका
- पोलिसांवर दबाव टाकणाऱ्याला सोडणार नाही
- कर्णकर्कश डीजे लावणाऱ्यांचे रेकॉर्ड तयार ; यांच्यावर प्रतिबंधात्मक कारवाई

### क्षमतेपेक्षा जास्त आवाज करणारे डीजे लावल्यास कठोर कारवाई

शिवजयंती निमित्त आयोजित शांतता कमिटी सदस्य व मंडळाच्या बैठकीत आलेल्या पदाधिकाऱ्यांना मिरवणुकीत कमीत कमी डेसिबल मध्ये स्पीकर लावण्याच्या सूचना दिल्या. यावेळी कमी डेसिबल असलेले २ बेस आणि २ टॉपचा डेमो ही आयुक्तलयाच्या बाहेर ठेवला होता.याप्रसंगी उपस्थित पदाधिकाऱ्यांना माहितीसाठी स्पीकर वर गाणे लावले. यापेक्षा जास्त आवाज करणारे स्पीकर लावता येणार नाही अन्यथा डॉल्बी मालकावर, मंडळावर आणि उत्सव अध्यक्ष यांच्यावर कडक कारवाई केली जाईल अशी माहिती आयुक्तांनी पदाधिकाऱ्यांना दिली.या अगोदरील जयंती उत्सव काळात डीजेचा दणदणाट करणाऱ्या २४ मंडळावर कारवाई केली असून यापुढे कोणाचीच गय केली जाणार नाही असा इशारा दिला.

### चौका चौकात लागलेल्या फ्लेक्सवर आयुक्त बरसले

शिवजयंती उत्सवानिमित्त शहरातील चौका चौकात फ्लेक्स लागले आहेत. यावर नाराजी व्यक्त करत आयुक्त म्हणाले यामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचा फोटो लहान अन शर्टाचे बटन उघडे ठेवलेल्या कार्यकर्त्यांचे फोटो मोठे लावले आहेत. शिवाजी महाराजांचे फोटो जरूर लावावे पण अशा कार्यकर्त्यांचे फोटो या फ्लेक्स वर नको आहेत.हे अत्यंत चुकीचे असून महापुरुषांच्या विचारांची जयंती साजरी केली पाहिजे.फ्लेक्स लावणाऱ्या तरुणांना यापुढे या फ्लेक्ससाठीचा खर्च कसा केला, पैसे कोठून आले हे विचारले जाणार आहे.